N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** भुदरगड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0126 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 29/04/2026 01:45

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिंनाक पासून):** 28/04/2026

**Date To ( दिंनाक पर्यंत):** 28/04/2026

**Time From (वेळेपासून):** 12:42 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:38 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 28/04/2026 **Time (वेळ):** 18:05 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 007

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 29/04/2026 01:26 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भुदरगड पोलीस ठाणे व साई कलनी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned by CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** वैष्णवी सुरेश पाटील
**(b) Husband's Name (पती चे नाव) :** सुरेश पाटील
**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981
**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधीक्षक, ,लाचलुचपत प्रतिबधक विभाग, कोल्, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधीक्षक, ,लाचलुचपत प्रतिबधक विभाग, कोल्, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**
**(j) Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9764140777

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | shubhas ananda chougale | | | 1. रा गुडाळ, ता राधानगरी, राधानगरी,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | मुस्तफा दस्तगीर शेख | | वडील का नाम : दस्तगीर शेख | 1. साई कलनी, गारगोटी, ,भुदरगड, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**



Scanned by CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रू दराच्या 100चलनी नोटा | 50,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

50,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनाक - 29/04/2026

मी वैष्णवी सुरेश पाटील, वय 45 वर्षे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 9764140777 समक्ष भुदरगड पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देते की,

मी दिनाक 27/04/2026 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना, मला इम्तीयाज अहमद खेडेकर, वय - 42 वर्षे, व्यवसाय - नोकरी, रा. अनफवाडी, ता. भुदरगड, जि.कोल्हापूर यांनी त्यांची लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगुन, तक्रारी अर्ज दिला. त्यातील मजकुर असा की, मी वरील ठिकाणी राहणेस असून खाजगी नोकरी करतो. माझेवर भुदरगड पोलीस ठाणे येथे अपघाताचा गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास भुदरगड पोलीस स्टेशन मधील पोलीस हेड कॉन्स्टेबल सुभाष चौगले हे करीत आहेत. सदर गुन्हयात त्यांनी माझी स्वीप्ट कार ताब्यात घेतली आहे. सदर गुन्हयाचे तपासात चौगले साहेब बोलवतील, त्यावेळी मी पोलीस ठाणेत जावुन त्यांना भेटत होतो. सुमारे आठ दहा दिवसापुर्वी मला चौगले साहेबांनी बोलावुन घेवुन गुन्हयात चार्जशीट व्यवस्थित पाठवतो, गुन्हयात ताब्यात घेतलेली माझी स्वीप्ट कार सोडुन देतो त्याकरीता 1,00,000/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन माझेकडे 1,00,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना काहीतरी कमी करा असे म्हणालो असता त्यांनी पैसे कमी करण्यास नकार दिला. त्यानंतर मी त्यांना एक आठवडभरात पैशांची जुळणा करून भेटतो असे सांगुन निघुन आलो होतो अशा मजकुरचा अर्ज दिला. तक्रारदार खेडेकर यांनी ते पोलीस चौगले यांना दिनाक 28/04/2026 रोजी भुदरगड पोलीस ठाणे येथे भेटणेस जाणार असलेचे सांगितले. त्यानंतर मी लागलीच मा. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग (उत्तर) कोल्हापर यांचे कार्यालयातुन लेखी रिपोर्टने दोन शासकीय पंच दिनाक 28/04/2026 रोजी पाठविणेबाबत कळविले. दिनाक 28/04/2026 रोजी सकाळी शासकीय पंच आलेनंतर आम्ही कार्यालयातील सापळा पथकातील अमंलदार यांना बोलावुन घेतले. त्यानंतर आम्ही सापळा पथक व पंचासह शासकीय वाहनातुन कोल्हापूर येथुन 09.45 वाजता निघुन तक्रारदार यांचे मामा अन्वर शेख अनफवाडी येथे त्यांचे घरी 11.30 वाजता पोहचलो. त्यावेळी तेथे तक्रारदार खेडेकर होते. आम्ही तक्रारदार खेडेकर यांची पंचाशी व सापळा पथकातील अमंलदार यांचेषी ओळख करुन दिली. माझे सुचनेवरून तक्रारदार खेडेकर यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली. खेडेकर यांनी तोंडी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. त्यावेळी मी पुढील कारवाई अन्वर शेख यांचे घरातील रिकाम्या खोलीतुन करण्याचे आहे असे सांगुन, तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार खेडेकर व पंच नं.01 पंकज भावके यांचेसह सर्वप्रथम भुदरगड पोलीस ठाणे येथील पोलीस सुभाष चौगले हे तक्रारदार यांचेकडे लाच मागणी करतात, अगर कसे याची पडताळणी करणार आहोत असे सांगितले. पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या तसेच शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये ड।ैजम्त् कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार खेडेकर व पंचाची खात्री करून दिली. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. पडताळणीचे अनुषंगाने तक्रारदार खेडेकर व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 12.42 वाजता चालु करून, तो तक्रारदार खेडेकर यांचे गळयात काळ्या दो-याच्या साहयाने अडकवुन, खेडेकर व पंच नं.1 पंकज भावके यांना तक्रारदार यांची मोटार सायकल नं.



Scanned by CamScanner

एम.एच. 09 जी डब्ल्यु.5712 वरून भुदरगड पोलीस ठाणे या ठिकाणी पोलीस सुभाष चौगले यांची भेट घेणेकरीता पाठविले. त्यावेळी आम्ही,सापळा पथक व पंच नं.02 शंकर आतिकेरी अन्वर शेख यांचे घरी थांबुन राहीलो. तक्रारदार खेडेकर व पंच नं.1 पंकज भावके असे काहीवेळाने आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 14.34 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 पंकज भावके यांना तुम्ही तक्रारदार यांचेसोबत भुदरगड पोलीस ठाणे येथे पोलीस सुभाष चौगले यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले, याबाबत विचारले असता, पंच भावके यांनी ते तक्रारदार यांचेसोबत भुदरगड पोलीस ठाणे या ठिकाणी गेले त्यावेळी तक्रारदार यांनी चौगले यांना फोन लावुन कोठे आहे याबाबत विचारले असता चौगले यांनी त्यांना पोलीस ठाणेचे पहिल्या मजल्यावरील खोलीत येण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार व मी असे चौगले यांना भेटलो. त्यावेळी त्यांचेत तक्रारदार यांचेवर दाखल असले गुन्हयाचे अनुषंगाने चर्चा झाली. त्यावेळी चौगले यांनी माझेकडे पाहुन हे कोण असे तक्रारदार यांना विचारले असता त्यांनी मित्र असल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी चौगले यांना मुस्तीफा शेख नावाचे इसमास फोन केला व ते त्याला पोलीस ठाणेस बोलवत होते. त्यावेळी चौगले तक्रारदार खेडेकर व मी असे चालत खालच्या मजल्यावर आलो त्यावेळी चौगले े यांनी मला खाली थांबण्यास सांगुन तक्रारदार खेडेकर यांना पोलीस ठाणेचे पहिल्या मजल्यावरीत एका खोलीत घेवुन गेले. त्यानंतर काहीवेळाने तक्रारदार व चौगले हे खोलीतुन बाहेर आले. त्यानंतर मी व तक्रारदार असे आपण थांबलेल्या ठिकाणी परत येत असताना तक्रारदार यांना मुस्ताफा नावाचे इसमाचा फोन आलेला, त्यावेळी त्यांचेत चौगले साहेबांना भेटुन आल्याचे अनुषंगाने चर्चा झाली त्यानंतर आम्ही परत आल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार खेडेकर यांना विचारले असता त्यांनी पंच नं. 01 भावके यांनी सांगितलेप्रमाणे हकीकत सांगुन पोलीस चौगले यांनी पंच भावके यांना खाली थांबण्यास सांगुन, मला पोलीस ठाणेच्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील एका खोलीत घेवुन गेले त्यावेळी आमचेत माझेवर दाखल असले गुन्हयाचे तसेच माझी गाडी सोडण्याचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी मी " हा.. काय काय करू म्हणता हे काय... " असे म्हणालो. त्यावेळी चौगले " आणलयं नव्हका ...... दे की ठेव यात.. " असे म्हणाले. त्यावेळी मी " नाय तेच विचारू म्हटलं काय विचारून हे करूया म्हटलं तुम्हाला.. " असे म्हणालो. त्यावेळी चौगले " हा तेच्या ...... विचारायला येतोचं नुसता काय ते आणलं नाहीस व्हय .. " असे म्हणाले. त्यावेळी मी " तेच तर तुमचं हे झालं ना किती हे करू या म्हणता.. " असे विचारले. त्यावेळी चौगले " म्हणजे सांगितलस ना तु त्या दिवशी तुझा तोंडाणं आलयं आणि काय सांगतोय .. " असे म्हणाले. त्यावेळी मी " किती .. " असे म्हणालो. त्यावेळी चौगले " त्या दिवशी काय सांगिंतलय.. " असे म्हणाले. त्यावेळी मी " पन्नास हजार.. " असे म्हणालो. त्यावेळी चौगले " नाही.. असे म्हणाले. त्यावेळी मी " ओ गप्प बसा चाळीस हजार प्लिज मला बाहेर जायचं हाय, काय ते फायनल करून टाका साहेब.. " असे म्हणालो. त्यावेळी चौगले " आता आणि अस काय करायलायसा त्या दिवशी तुम्ही बोलेलं... " असे म्हणाले. त्यानंतर चौगले यांनी मला मुस्तफा यांना फोन करण्यास सांगितला. त्यावेळी मी मुस्ताफ यास फोन केला त्यावेळी मी व चौगले साहेब त्यांचेशी फोनवर त्यावेळी माझे व मुस्तफा याचे चौगले साहेबांना फायनल किती पैसे सांगतात या अनुषंगाने बोेलने झाले. त्यावेळी मी " तो म्हणतोय, मी विचारतो आता तुम्हीच सांगा.. " असे म्हणालो. त्यावेळी चौगले " मी एक दहा कमी करतो, चाळीस हजार दे, का ते पण जमणार नाही,आ .. " असे म्हणाले. त्यावेळी मी " तुम्ही बघा तुम्हाला माहित आहे साहेब म्हणून ओ.. " असे म्हणालो. त्यानंतर आमचेत गुन्हयाचे कलम कमी करण्याचे व चार्जशीट चे अनुषंगाने गाडी सोडण्याचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी चौगले " मी काय बोलणार नाही तु आणि मुस्ताक हे करा, चर्चा करा.." असे म्हणाले. त्यावेळी मी " ठिक हाय .. " असे म्हणालो त्यावेळी चौगले " मुस्तफा कडं हे करा.. " असे म्हणाले. त्यावेळी मी " ठिक हाय चालतयं, पैशाचं काय करू त्याचेकडं देवू तुमच्याकडं,.... त्याचेकडं.... " असे म्हणाले. त्यावेळी चौगले े हु.. " असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच भावके असे परत आलो आहे अशी हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमधील तक्रारदार खेडेकर पोलीस सुभाष चौगले यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण दोन्ही पंच व तक्रारदार खेडेकर यांचेसमक्ष ऐकले. यावरून तक्रारदार खेडेकर व पोलीस सुभाष चौगले यांची भेट होवुन त्यांच्यामध्ये तक्रारदार यांचेवर दाखल असले गुन्हयाचे अनुषंगाने तसेच तक्रारदार यांचेवर दाखल असले गुन्हयाचे चार्जशिट मध्ये मदत करतो व ताब्यात घेतलेली स्विप्ट कार सोडणेकरीता चौगले यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती 40,000/- रूपये मागणी केल्याचे तसेच सदरचे पैसे तक्रारदार व पोलीस चौगले यांचे ओळखीचे मुस्तफा शेख यांच्याकडे देवुन त्यांचेशी चर्चा करण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर माझे सुचनेवरून तक्रारदार खेडेकर यांनी त्यांचे मो.क्र.9322602249 वरून मुस्तफा शेख यांचे मो.क्र.8380830222 वरती16.19 वाजता फोन केला त्यावेळी त्यांचेत पोलीस चौगले यांना भेटल्याचे अनुषंगाने व त्यांनी 40,000/- रूपये मागणी केल्याचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी मुस्तफा " नहीं उसको 50



Scanned by CamScanner

बोल कर बोला उनको आगे उधर 40 बोलताय उनको बोल 50 करणे को बोल.... " असे म्हणाले. त्यावेळी खेडेकर " हु .." असे म्हणाले. त्यावेळी मुस्तफा " अभी जो बोला सब कॅन्सल, एकच डिल कर 50 बोल उसको... " असे म्हणाले. त्यावेळी खेडेकर " पैसो का क्या करू तेरे पास देवू क्या , मुझे बोला था तुमसे चर्चा कर.. " असे म्हणाले. त्यावेळी " मुस्तफा दे मुझे मे देता हु शाम को बार पर.... " असे म्हणाले. त्यानंतर मुस्ताफा याने मला पैसे घेवुन गारगोटी येथे त्याचे घरी येण्यास सांगितल्याचे अनुषंगाने बोलने झाले. त्यानंतर फोन बंद केला. सदरचा कॉल रेकॉर्ड केला. मुस्ताफा शेख याने तक्रारदार यांच्याकडे चौगले साहेब यांना देण्यासाठी 50,000/- लाचेची मागणी करून मागणी केलेले पैसे घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आम्ही पोलीस सुभाष चौगले व खाजगी इसम मुस्ताफा शेख यांचे लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई सुरु केली.

सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही सर्वांना सुचना दिल्या. त्यानंतर मी तक्रारदार खेडेकर यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- दराच्या 100 चलनी नोटा असे 50,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार खेडेकर व पंचाना अॅंथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व, संपुर्ण कार्यवाही, तसेच त्याअनुषंगाने तक्रारदार खेडेकर व दोन्ही पंचाची निवेदने घेतली.त्यानंतर अॅंथ्रासिन लावलेले 50,000/- रूपये तक्रारदार यांचे पॅन्टचे उजवे बाजुचे पुढील खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार खेडेकर , दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. तसेच तक्रारदार खेडेकर यांना खाजगी इसम मुस्तफा शेख यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांनी त्यांचे हातरूमाल तोंडांवरून फिरवण्याचा आहे हा पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले. त्यावेळी मुस्तफा शेख यांचा तक्रारदार यांचे फोनवर मिसकॉल आला. त्यावेळी आमचे सुचनेवरून खेडेकर यांनी मुस्ताफा यांना 16.50 वाजता फोन केला. त्यावेळी मुस्तफा यांनी खेडेकर यांना कोठे आहे असे विचारून लवकर येण्यास सांगितलेचे अनुषंगाने बोलने झाले. सदरचा फोन कॉल रेकॉर्ड केला आहे. त्यावेळी आम्ही स.पो.फौ.प्रकाश भंडारे व पो.हे.कॉ.विकास माने यांना मुस्तफा शेख यांनी लाच रक्कम स्विकारल्यानतर पोलीस सुभाष चौगले यांचेवर वॉच ठेवणेकामी रवाना केले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर 16.51 वाजता सुरू करून, तो तक्रारदार खेडेकर यांचे शर्टचे आतमध्ये काळे दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार खेडेकर व पंच नं.1 पंकज भावके असे त्यांचे मोटर सायकलने गारगोटी येथे मुस्तफा शेख यांची भेट घेण्याकरीता पाठविले. त्यावेळी त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.2 शंकर आतिकेरी असे आमचेकडील वाहनातुन तक्रारदार यांचे पाठोपाठ साई कॉलनी गारगोटी येथे आलो. तेथे आम्ही आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. तक्रारदार खेडेकर एका घराजवळ थांबले त्यावेळी त्या घरासमोर एक व्यक्ती उभी होती त्याचेशी तक्रारदार हे बोलत होते यावरून हा इसम मुुस्तफा शेख असल्याचे खात्री झाली. त्यानंतर काहीवेळाने तक्रारदार खेडेकर यांनी मुस्तफा शेख यांनी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता मी, पंच नं.02 शंकर आतिकेरी व स्टाफ तेथे गेलो. तक्रारदार खेडेकर यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर 17.38 वाजता बंद करून, तात्काळ लाच स्विकारलेल्या रक्कमेसह मुस्ताफा शेख यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून पंचाचे समक्ष खाजगी इसम मुस्तफा शेख यांचेकडुन लाच रक्कम हस्तगत केली. सदर सापळा ठिकाणचे व्हिडीओ शुटींग आमचे सुचनेवरून सापळा पथकातील अमंलदार यांनी केलेले आहे. त्यानंतर आम्ही मुस्तफा शेख याला घेवुन भुदरगड पोलीस ठाणे येथे आलो तेथे आम्ही सापळा कारवाईचे अनुषंगाने पोलीस सुभाष चौगले यांना ताब्यात घेतले. त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.1 पंकज भावके यांना सापळा कारवाईवेळी काय हकीकत घडली असे विचारले असता, त्यांनी सांगितले की, ते व तक्रारदार गारगोटी येथे मुस्तफा शेख यांना त्यांचे घरासमोर भेटले. त्यावेळी मुस्तफा दे तो अभी.. असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार खेडेकर फोन लगाऊ ऊसको.. असे म्हणाले. त्यावेळी मुस्तफा किसको.. असे म्हणाले. त्यावेळी खेडेकर चौगले साहेब कॉल करू.. असे म्हणाले. त्यावेळी मुस्तफा क्या बोलु, दे मै देता हुं दे◌ो...असे म्हणाले. त्यावेळी खेडेकर ले.. असे म्हणुन चौगले व मुस्तफा यांनी मिळुन त्यांचेकडे मागणी केलेली लाच रक्कम 50,000/- रूपये मुस्तफा यांचेकडे दिली. त्यावेळी मुस्तफा यांनी तक्रारदार यांचेकडुन 50,000/- उजव्या हाताने स्विकारले व हया रोज का यही व्यवहार होता है असे म्हणाले. त्यानंतर मुस्तफा हे तक्रारदार यांचेकडुन घेतलेले पैसे दोन्ही हातानी मोजु लागले. त्यावेळी तक्रारदार खेडेकर पुन्हा मुस्तफा यांना चौगले साहेब यांना फोन करा असे म्हणाले. त्यावेळी मुस्तफा शेख यांनी त्यांचे मो.क्र. 8380830222 वरून पोलीस सुभाष चौगले यांचे मो.नं.7972306273 वरती फोन केला त्यावेळी मुस्तफा हां साहेब इम्तीयाज आलाय इथ असे म्हणाले. त्यावेळी चौगले कुठ आला असे विचारले त्यावेळी मुस्तफा घरात आलाय आमच्या असे म्हणाले. त्यावेळी चौगले दिलेत असे विचारले त्यावेळी मुस्तफा हो होय असे म्हणाले त्यावेळी चौगले किती असे विचारले. त्यावेळी पन्नास आहेत असे म्हणाले त्यावेळी चौगले बर बर असे म्हणाले त्यावेळी मुस्तफा यांनी चौगले यांना कोठे आहे म्हणुन विचारले त्यावेळी चौगले यांनी पोलीस ठाणेमध्ये असल्याचे सांगितले. फोन बंद



Scanned by CamScanner

केल्यानंतर तक्रारदार खेडेकर यांनी मुस्तफा शेख यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतरचा नियोजीत इशारा केला असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारले असता त्यांनी पंच भावके यांचे हकीकतशी मिळती जुळती हकीकत सांगितली. पुढील सर्व कार्यवाही भुदरगड पोलीस ठाणे येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार इम्तीयाज अहमद खेडेकर यांचेविरूध्द भुदरगड पोलीस ठाणे येथे दाखल असले गुन्हयाचा तपास पो.हे.कॉ.सुभाष चौगले हे करीत असुन,त्यांनी तक्रारदार यांना त्या गुन्हयात मदत करतो, चार्जशीट व्यवस्थित पाठवतो व ताब्यात घेतलेली स्वीप्ट कार सोडुन देतो. याकरीता तक्रारदार यांच्याकडे स्वताःकरीता बेकायदेशीरपणे 40,000/- रूपये लाचेची मागणी केली. मागणी केलेली लाच रक्कम खाजगी इसम मुस्तफा शेख यांच्याकडे देण्यास सांगितली. परंतु खाजगी इसम मुस्तफा याला तक्रारदार खेडेकर यांचेकडुन 50,000/- रूपयेच घेण्याची सुचना सुभाष चौगले यांनी केली. त्याप्रमाणे खाजगी इसम मुस्तफा दस्तगीर शेख यांनी लोकसेवक सुभाष चौगले यांनी तक्रारदार यांच्याकडे बेकायदेशीरपणे मागणी केलेली लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करून, तक्रारदार यांना पोलीस सुभाष चौगले यांना देण्यासाठी 50,000/- रूपयांची लाचेची मागणी करून, ती 50,000/- रूपये लाच रक्कम तक्रारदार खेडेकर यांचेकडुन, बेकायदेशीरपणे व अप्रामाणिकपणे स्विकारताना त्यांना आम्ही व सापळा पथकाने पकडले आहे. म्हणुन माझी आरोपी लोकसेवक 01) सुभाष आनंदा चौगले, वय - 39 वर्षे, पद - पोलीस हेड कॉन्स्टेबल,ब.नं.2052, नेमणुक - भुदरगड पोलीस ठाणे, रा. गुडाळ, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर, 02) मुस्तफा दस्तगीर शेख, वय - 41 वर्षे, (खाजगी इसम), रा. साई कॉलनी, गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबधक कायदा 1988 चे कलम 7, 12 प्रमाणे माझी फिर्याद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून, तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष

हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

GORAKH KASHINATH CHOUDHAR(I (Inspector)) / DGPGKCM8002

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **or (किंवा)**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned by CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
ठाणे अंमलदार
भाईंदर पोलीस ठाणे
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): GORAKH KASHINATH
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPGKCM8002



Scanned by CamScanner